Exh. 6

महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन कळमेश्वर तहसिल कळमेश्वर जिल्हा नागपुर ग्रामीण
फोन नं. 07118–271227, पिन कोड नं. 441501
EMAIL ID – Kalmeshwarwireless@gmail.com

जावक क्रं. ......................../2026 दिनांक....10../03/2026

प्रती,

मा. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी सा.
न्यायमंदिर कळमेश्वर
यांचे सेवेशी

संदर्भ :– Mis.Cri. Appl. No. 27/2026 दि. 02/03/2026

अर्जदारः– अभिषेक प्रमोद बांबल, वय 22 वर्षे, राह. वार्ड क्रं. 03, झेंडा चौक, कळमेश्वर, जि. नागपुर

विषय :– पोस्टे कळमेश्वर अप. क. 220/2026 कलम 12 म.जु.का. गुन्हयामध्ये विवो वाय 27 कंपनीच्या जप्त मोबाईल चे सुपुर्तनाम्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर आहे की, दि. 27/02/2026 रोजी गोपनिय माहीती मिळाली की, पोस्टे कळमेश्वर हद्दीमध्ये प्रभाग क्रं. 3, शिवशक्ती सेलीब्रेशन लॉन च्या मागे काळे यांचे शेतीत रिकाम्या जागेत काही इसम हे 52 तास पत्यावर पैश्याची बाजी लावून हारजितचा जुगार खेळ खेळत आहे. अशा खबरेवरून स्टाफसह रेड केला असता, घटनास्थळावर पाच जुगारी ईसम जुगार खेळतांना मिळुन आले. त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन नगदी 1400 रू., 20 तासपत्ते व अनुक्रमे 1) एक विवो वाय 300 5 जी कंपनीचा मोबाईल, किंमती 15,000 रू. 2) एक रिअलमी 6 कंपनीचा मोबाईल किंमती 10,000 रू. 3) एक विवो वाय 29 5 जी कंपनीचा मोबाईल, किंमती 10,000 रू. असा एकुण किंमती 36,400 रूपये तसेच घटनास्थळावर 320 रू. नगदी व 12 तासपत्ते तसेच 1) पॅशन प्रो क्रं. एमएच 40 एच 3754 असलेली किंमती अंदाजे 30,000 रू. 2) स्प्लेंडर प्लस मोटार सायकल क्र एम.एच. 40 सी.एन. 9219 किंमती अंदाजे 25,000 रुपये 3) एक सीबी शाईन क्रं. एमएच 40 बीयु 5414, किंमती 45,000 रू., 4) होन्डा डिलक्स क्रं. एमएच 40 एक्स 9753, किंमती 20,000, 5) पॅशन एक्स प्रो क्रं. एमएच 40 एएच 9428, किंमती 35,000 रू., 6) युनिकॉर्न मो.सा. क्रं. एमएच 40 बीएन 8733, किंमती 50,000 रू. व 7) एक विवो वाय 27 कंपनीचा मोबाईल, किंमती 10,000 रू., तसेच 8) एक विवो वाय 12 कंपनीचा मोबाईल, किंमती 5,000 रू. अशाप्रकारे नगदी 1720 रू. तसेच मोटार सायकल व मोबाईल किंमती एकूण 2,55,000 रू. असा एकुण 2,56,720 रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्तीपंचनामा कार्यवाही करून जप्त करण्यात आला. व पोलीस स्टेशनला रितसर रिपोर्ट देउन अप. क्रं. 220/2026 कलम 12 म.जु.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

आपले कोर्टामध्ये नमुद अर्जदार श्री. अभिषेक प्रमोद बांबल, वय 22 वर्षे, राह. वार्ड क्रं. 03, झेंडा चौक, कळमेश्वर, जि. नागपुर यांनी सदरचा विवो वाय़ 27 कंपनीचा मोबाईल हा त्यांचे मालकीचा असल्याने सुपुर्दनाम्यावर सोडण्यासाठी अर्जामध्ये नमुद केलेले आहे. घटनेच्या वेळी नमुद जुगारावर रेड केला असता, घटनेच्या वेळी काही जुगारी ईसम घटनास्थळावरून पळुन गेलेले होते. त्यांचा पाठलाग केला असता ते मिळुन आले नव्हते. परंतु नमुद पळुन गेलेल्या आरोपींचे घटनास्थळी मोबाईल मिळुन आले होते. वरून घटनास्थळावर मिळालेला मोबाईल हा जुगारी ईसमांपैकीच एकाचा असल्याचे लक्षात आल्याने जप्त करण्यात आला होता. तपासामध्ये असे दिसुन आले की, सदरचा विवो वाय 27 कंपनीचा मोबाईल हा अर्जदार अभिषेक प्रमोद बांबल यांचा असुन घटनेच्या वेळी ते स्वतः जुगार खेळण्यासाठी घेउन आलेले होते. व पोलीसांची रेड झाली असता, घटनास्थळावरून पळुन जात असतांना मोबाईल हा घटनास्थळीच पडला होता. वरून नमुद अर्जदार/आरोपीचा शोध घेउन त्यांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आलेले आहे. नमुद मोबाईलचे मालक यांनी मोबाईल सुपुर्दनाम्यावर सोडण्यासाठी आपले मा. कोर्टामध्ये अर्ज सादर केलेला आहे. परंतु नमुद अर्जदार यांनी पोलीस

Order
Seen

RAVINDRA RATHOD

Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2026.03.16 17:48:45 +0530

स्टेशन कळमेश्वर येथे नमुद मोबाईल मालकीचे/संबंधीचे कोणतेच कागदपत्रे सादर केलेली नाहीत. नमुद अर्जदार/आरोपी ईसम हे जुगार खेळण्याचे सवयीचे दिसत असुन त्यांना सदरचा मोबाईल सुपुर्दनाम्यावर परत केल्यास सदरच्या मोबाईलचा उपयोग परत जुगार खेळण्यासाठी किंवा अवैध प्रकारासाठी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता नमुद अर्जदार अभिषेक प्रमोद बांबल, वय 22 वर्षे, राह. वार्ड क्रं. 03, झेंडा चौक, कळमेश्वर यांना विवो वाय 27 कंपनीचा मोबाईल हा सुपुर्दनाम्यावर सोडण्यास आमची हरकत आहे.

करीता सदरचा अहवाल सविनय आपले सेवेशी सादर आहे.

Tayde

पो.हवा. प्रजोक तायडे
ब.नं. 1946
पोलीस स्टेशन कळमेश्वर

सविनय सादर

(मनोज काळबांडे)
पोलीस निरिक्षक
पोलीस स्टेशन कळमेश्वर

Say by A.P.P.

(1) Applicant's mobile was seized u/s 12(a) of gambling act from the spot.

(2) perusal of say of I.O it is gather that; accused was ran away from spot at the time of raid & left this mobile to the spot

(3) said phone if released he will used it again to do similar act again

(4) Hence said application kindly be rejected

[signature] 1/2/8/26
Pallavi Sonawane
A.P.P.

IN THE COURT OF C.J. Jr.Dn./ J.M.F.C., -

C.No. 27/2026 F.F. / /

Abhishek Pramod Bambal

V/S

APPLICANT :- State of Maharashtra

## APPLICATION FOR GRANT OF PERMISSION FOR HAMDAST

Applicant submit as under :-

1] That today applicant is present in the Court.

2] That in the above case Hamdast is required and the applicant is ready to take the Hamdast. -

3] That therefore this application for grant of permission for Hamdast.

Hence this application.

**PRAYER** :- It is therefore humbly prayered before this Hon'ble Court be pleased to allow this application and give thereby ' . permission for Hamdast to the applicant in the interest of justice and in the above mentioned circumstances.

[signature]

*APPLICANT*

DATE - / /20